# मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय तथा सक्षम प्राधिकारी यांचेसमोर

( क्र.०५/ व्हिओसी/सुनावणी/२०२६/237 )

**महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम २०१३ अन्वये अर्ज.**

**सहसंचालक**
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, अमरावती ... अर्जदार

**विरुध्द**

**संचालक**
मार्कडेंय कनिष्ठ महाविद्यालय,
बरडगांव ता. राळेगांव जि. यवतमाळ ... प्रतिवादी

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे व अनधिकृत अभ्यासक्रम सुरू करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ चे कलम ५ व "महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यासक्रम (तक्रारी, अपील व सुधारात्मक उपाययोजना) नियम, २०२४" निर्गमित केले आहेत.

## पूर्वपीठिका

मार्कंडेय कनिष्ठ महाविद्यालय,बरडगांव ता.राळेगांव जि.यवतमाळ या संस्थेने शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये इयत्ता ११ वी साठी कॉम्पुटर सायन्स या व्यवसाय अभ्यासक्रमास ३१ विद्यार्थ्यांचे अनधिकृत प्रवेश दिले असल्याचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, यवतमाळ यांना कळविले आहे. त्या अनुषंगाने सहसंचालक प्रादेशिक कार्यालय अमरावती यांनी त्यांच्या दि.०१/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर संस्थेच्या अनधिकृत प्रवेशाबाबत संचालनालयास सादर केले आहे.

२.सबब संस्थेने शासनाची मान्यता नसताना कॉम्पुटर सायन्स या अभ्यासक्रमात प्रवेश देऊन महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम २०१३ या अधिनियमाचे उल्लंघन केले आहे.

## सुनावणी

सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक ०५/०५/२०२६ रोजी आयोजित केल्याबाबत संचालनालयाच्या दिनांक २८/०४/२०२६ रोजीच्या पत्राद्वारे संस्थेस कळविण्यात आले होते. तथापि, दिनांक ०४/०५/२०२६ रोजी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यवतमाळ यांनी यांच्या पत्रान्वये संस्थेचे प्राचार्य एन आय सुनावणीचा दिनांक पुढे करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे व स्वतः जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण अधिकारी हे निरीक्षणा करीता जात आहे तरी दिनांक ५/०५/२०२६ रोजी आयोजित सुनावणीस मुदतवाढ द्यावी अशी विनंती केली.

त्या अनुषंगाने सदर सुनावणी स्थगित करण्यात आली.त्यानंतर सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक २१/०५/२०२६ रोजी आयोजित केल्याबाबत संचालनालयाच्या दिनांक ११/०५/२०२६ रोजीच्या पत्राद्वारे संस्थेस कळविण्यात आले असून, संचालनालयाच्या दिनांक ७ ऑगस्ट २०२५ च्या सुधारित कार्यालयीन आदेशान्वये गठीत करण्यात आलेल्या

सत्यशोधन समितीच्या(Fact Finding Committee)दिनांक १३/०४/२०२६ च्या अहवालानुसार सदर संस्थेची अंतिम सुनावणी दिनांक २१/०५/२०२६ रोजी घेण्यात आली.

सुनावणीस खालील अधिकारी/प्रतिनिधी उपस्थित होते :

- श्री. नि. आ. निकम, उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय, मुंबई
- श्रीमती सोनम चौधरी, सहायक संचालक (तांत्रिक), संचालनालय, मुंबई
- श्री विजय वानखेडे, निरीक्षक, प्रादेशिक कार्यालय, अमरावती
- श्री. एम. डी. सिडाम, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, यवतमाळ
- प्रतिवादी संस्थेच्या वतीने श्री. संतोष कोकुलवार, संचालक

अर्जदार व प्रतिवादी यांनी दिनांक २१/०५/२०२६ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान तोंडी युक्तिवाद सादर केला. त्यानंतर मा. संचालकांनी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, यवतमाळ यांना संस्थेने केलेल्या अनधिकृत विद्यार्थी प्रवेश समायोजनाबाबत अहवाल दिनांक २२/०५/२०२६ रोजी सादर करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार सदर प्रकरण आदेशासाठी राखून ठेवण्यात आले (Case Closed for Order).

## अर्जदार प्रादेशिक कार्यालय, अमरावती यांचा युक्तिवाद

३. अर्जदारांनी नमूद केले की :

- मार्कडेंय कनिष्ठ महाविद्यालय, बरडगांव ता. राळेगांव जि. यवतमाळ या संस्थेमधील कॉम्पुटर सायन्स या व्यवसाय अभ्यासक्रमास वर्ष २०२१-२२ ते वर्ष २०२३-२४ सतत तिन वर्ष मंजुर प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के पेक्षा कमी प्रवेश झाल्यामुळे प्रादेशिक कार्यालय अमरावती यांचे पत्र क्र. क-/व्हिओसी/व्य.मा.रद्य/आदेश/२०२४/६९६६ दिनांक १०/१२/२०२४ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासुन कॉम्पुटर सायन्स व्यवसाय अभ्यासक्रमाची तुकडी बंद करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यानुसार जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यवतमाळ यांनी त्यांचे पत्र क्र.क-२/व्हीओसी/मान्यता रद्द/२०२४/१००७ दिनांक २४/१२/२०२४ अन्वये संस्थेस कळविण्यात आले आहे.संस्थेने शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये ईयत्ता ११ वी मध्ये फ्रेश वाटर फिश कल्चर (१४ विद्यार्थी ) व कॉम्पुटर सायन्स (१६ विद्यार्थी) अभ्यासक्रमास विद्यार्थी प्रवेशित केले.
- ·संस्थेने केलेल्या विनंतीनुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हीत लक्षात घेता ऐकवेळची विशेष बाब म्हणून संस्थेचे सत्र २०२४-२५ मध्ये कॉम्पुटर सायन्स या व्यवसाय अभ्यासक्रमास केलेल्या प्रवेशास मान्यता देण्यात येत आहे. पुढील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये कॉम्पुटर सायन्स व्यवसाय अभ्यासक्रमास कुठल्याही परीस्थितीत प्रवेश होणार नाही याची दक्षता घ्यावी. २०२५-२६ मध्ये कॉम्पुटर सायन्स व्यवसाय अभ्यासक्रमास प्रवेश केल्यास सदर प्रवेश हे अवैध समजण्यात येतील व सदर संस्थेवर सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० दिनांक २१ ऑगस्ट २०१३ मधिल तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल, असे प्रादेशिक कार्यालय अमरावती यांचे पत्र क्रमांक का-१व्हिओसी/प्रवेश परवानगी/२०२४/७२७४ दि.२६/१२/२०२४ च्या पत्रान्वये जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यवतमाळ कळविण्यात आले. तरी मार्कंडेय कनिष्ठ महाविद्यालय,बरडगांव ता.राळेगांव जि.यवतमाळ या संस्थेचे प्राचार्य यानी शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये इयत्ता ११ वी साठी कॉम्पुटर सायन्स या व्यवसाय अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांचे ३१ दिले असल्याचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, यवतमाळ यांना दि.०३/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये

कळविले. तदनंतर जिल्हा व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यवतमाळ यांनी त्यांच्या दिनांक ७/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर बाब सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय अमरावती यांना अवैध प्रवेशाबाबत पुढील कार्यवाही करीता सादर केली. त्या अनुषंगाने सहसंचालक प्रादेशिक कार्यालय अमरावती यांनी त्यांच्या दि.०१/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर संस्थेच्या अनधिकृत प्रवेशाबाबत संचालनालयास सादर केले आहे.

- त्या अनुषंगाने संचालनालयाच्या दि.०६/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्रादेशिक कार्यालय अमरावती यांना अधिनियमातील तरतूदीनुसार मार्कंडेय कनिष्ठ महाविद्यालय यवतमाळ.राळेगांव जि.बरडगांव ता,या संस्थेच्या प्राप्त तक्रारी बाबत प्राथमिक चौकशी करून अहवाल संचालनालयास सादर करणे बाबतच्या सूचना देण्यांत आल्या होत्या.
- उपरोक्त पत्रान्वये जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यवतमाळ यांनी प्राथमिक चौकशी करून दि.१५/०१/२०२६ रोजी सत्यशोधन समिती सदस्यांचे प्राथमिक निरिक्षणाचे अभिप्राय सादर केले आहेत .
- मार्कडेंय कनिष्ठ महाविद्यालय, बरडगांव ता. राळेगांव जि. यवतमाळ या संस्थेने मान्यता नसताना शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये इ.११ वी करीता कॉम्पुटर सायन्स या अभ्यासक्रमास ३१ विद्यार्थी प्रवेशित केले सदर प्रवेश हे अनधिकृत असून ही बाब चुक झालेली आहे व ती मान्य आहे अशी कबुली ,संस्थेने दिलेली आहे असे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यवतमाळ यांनी सांगितले.

## प्रतिवादी यांचा युक्तिवाद

४. प्रतिवादी संस्थेच्या प्राचार्यांनी नमूद केले की -

- संस्था प्रमुखांनी शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये इ वी साठी ११ .३१ विद्यार्थी कॉम्पुटर सायन्स या व्यवसाय अभ्यासक्रमास शासनाची कायम स्वरूपी मान्यता नसताना अनधिकृत प्रवेश दिले असल्याचे सांगितले.
- सदर चूक मान्य असून भविष्यात अशा प्रकारचे अनधिकृत प्रवेश केले जाणार नाहीत अशी हमी देऊन संस्थेच्या प्राचार्यांनी संस्थेवर कमीत कमी शास्ती लादण्यात यावी, अशी विनंती केली.

## निष्कर्ष

सहसंचालक अर्जदार यांचा युक्तिवाद, सत्यशोधन समिती अहवाल, संस्थेचे तोंडी युक्तिवाद, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यवतमाळ अहवाल यांचा विचार करून निष्कर्ष खालील प्रमाणे :

१. मार्कडेंय कनिष्ठ महाविद्यालय, बरडगांव ता. राळेगांव जि. यवतमाळ या संस्थेत कॉम्पुटर सायन्स या व्यवसाय अभ्यासक्रमास शासनाची कायम स्वरूपी मान्यता नसताना शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये इ. ११ वी साठी ३१ अनधिकृत प्रवेश केले आहेत.

२. संचालनालयाच्या दिनांक ७ ऑगस्ट २०२५ च्या सुधारित कार्यालयीन आदेशान्वये गठीत करण्यात आलेल्या सत्यशोधन समितीच्या (Fact Finding Committee) अहवालानुसार सदर संस्थेची अंतिम सुनावणी दिनांक २१/०५/२०२६ रोजी घेण्यात आली.

३. सदर सुनावणीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी संस्थेस भेट देऊन केलेल्या दस्तऐवज पडताळणीनुसार, संस्थेने इयत्ता ११ वी साठी रु. ५,०००/- इतकी फी विद्यार्थ्यांकडून आकारलेली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

४. संस्थेस परिणामांची कल्पना असताना देखील विद्यार्थ्यांची दिशाभूल करण्यात आली.

५. त्यामुळे सदर प्रकरणात संस्थेकडून अधिनियम, २०१३ मधील कलम ३ चे स्पष्ट उल्लंघन झालेले असून, त्याअनुषंगाने अधिनियमाच्या कलम ४ नुसार संस्था शास्तीस पात्र ठरते.

# आदेश

१) प्रतिवादी मार्कंडेय कनिष्ठ महाविद्यालय, बरडगांव, ता. राळेगाव, जि. यवतमाळ यांनी शासनाची मान्यता नसताना शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये इयत्ता ११ वीच्या कॉम्प्युटर सायन्स या व्यवसाय अभ्यासक्रमात ३१ विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन अधिनियम, २०१३ मधील कलम ३ चे उल्लंघन केलेले असल्याचे सिद्ध झाले आहे.

२) परिणामी, प्रतिवादी संस्था शास्तीस पात्र ठरविण्यात येत असून, संस्थेवर रु. २,०००००/- (रुपये दोन लाख फक्त) इतकी आर्थिक शास्ती लादण्यात येत आहे.

३) प्रतिवादी संस्थेने सदर दंडाची रक्कम हा आदेश प्राप्त झाल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत शासनाने विहित केलेल्या पद्धतीने जमा करून त्याची पूर्तता अहवालासह पावती जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, यवतमाळ यांच्याकडे सादर करावी.

४) प्रतिवादी मार्कंडेय कनिष्ठ महाविद्यालय, बरडगांव, ता. राळेगाव, जि. यवतमाळ यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये कॉम्प्युटर सायन्स या व्यवसाय अभ्यासक्रमात अनधिकृतरीत्या प्रवेशित केलेल्या ३१ विद्यार्थ्यांचे समायोजन स्व. के. जी. वाघ कनिष्ठ महाविद्यालय, कळंब येथे करण्यात यावे. सदर समायोजनाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा अनुपालन अहवाल आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, यवतमाळ यांच्यामार्फत संचालनालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

५) संस्था भविष्यात कोणत्याही अभ्यासक्रमास शासनाची मान्यता नसताना विद्यार्थ्यांची दिशाभूल करून अथवा अन्य कोणत्याही प्रकारे अनधिकृत प्रवेश करणार नाही, याबाबतचे हमीपत्र सक्षम प्राधिकरणाकडे सादर करावे.

६) प्रस्तुत निर्णयाची माहिती सर्व संबंधितांना कळविण्यात यावी.

या सुनावणी आदेशाबाबत संस्थेस अपील करावयाचे असल्यास अधिनियमातील कलम ७ अन्वये नियुक्त अपिलिय अधिकारी, सहसचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांत अपिल करता येईल.

स्थळ - मुंबई

दिनांक - 16/07/2026

( सतिश रू. सुर्यवंशी )
संचालक

प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

१. मा.सहसचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती
३. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय,यवतमाळ यांना कळविण्यात येते कि, सदर संस्थेने उक्त शास्तीची रक्कम भरल्याशिवाय सदर संस्थेबाबत पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात येवू नये. तसेच सदर शास्तीच्या रक्कमेच्या चलनाची प्रत संचालनालयास सादर करण्यांत यावी.
४. मार्कंडेय कनिष्ठ महाविद्यालय, बरडगांव, ता. राळेगाव, जि. यवतमाळ (जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, यवतमाळ यांचेमार्फत)
५. निवडनस्ती (का.क्र.०५)